जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2017
तरुण भारत

# महर्षी वाल्मिकी यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, उमेश भोसले, शरद पाटील, धिरज शिंदे, एम. एल. सोनटक्के उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2017
लोकमत

# इंग्रजी विभागप्रमुखपदी चंद्रकांत लंगरे

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभाग प्रमुखपदी डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड झाली. त्यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इटली येथील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध सादर केले आहेत.

डॉ. लंगरे हे मूळचे धरणगुत्ती (जि. कोल्हापूर) येथील आहेत. सध्या ते इंग्रजी विभागात कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय चर्चासत्र, विद्यापीठ अनुदान मंडळाद्वारे पुरस्कृत उजळणी वर्गामध्ये साधन व्यक्ती म्हणून काम केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत एकूण सात विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2017
सकाळ



कोल्हापूर : राष्ट्रीय सेवा योजनेतील उत्कृष्ट कामाबद्दल राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. राजेंद्र कोळेकर यांचा गौरव करताना उच्च शिक्षणमंत्री विनोद तावडे, राज्यमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

# राजेंद्र कोळेकर यांचा गौरव

कोल्हापूर, ता. ९ : येथील यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमधील ज्युनियर विभागातील पर्यवेक्षक आणि कोल्हापूर शिक्षण उपसंचालक कार्यालयांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय संचालक प्रा. राजेंद्र कोळेकर यांना महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजनेत केलेल्या कार्याबद्दल उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून गौरविण्यात आले. मुंबई विद्यापीठाच्या कॉन्व्होकेशन सभागृहात शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. अप्पर मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दयानंद शिंदे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, राज्य संपर्क अधिकारी अतुल साळुंखे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. शिक्षण उपसंचालक मकरंद गोंधळी, सहसंचालक एन. डी. पारधी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, उपप्राचार्या ऋतुजा बडसकर, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांचे त्यांना सहकार्य लाभले.

10 OCT 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. मोरे यांची विद्यापीठ प्रशासनाला धोरणात्मक दिशा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : सेवानिवृत्तीनिमित्त डॉ. मोरे यांचा सपत्नीक सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

चानाक्ष बुध्दी, अभ्यासू व्यक्तीमत्व, निर्णयक्षमता, उत्तम प्रशासक असे अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेल्या डॉ. मोरे यांनी विद्यापीठाला धोरणात्मक दिशा देण्याचे काम केले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शहाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि शिवाजी विद्यापीठाच्या बीसीयुडीचे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त गौरव करण्यात आला. या गौरव समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शहाजी महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या गौरव सोहळयात डॉ. राजेखान शानेदिवाण संपादित 'प्रेरणा' या गौरवअंकाचे प्रकाशन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे यांनी प्रमुख



कोल्हापूर : शहाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अनिता शिंदे. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मानसिंग बोंद्रे, डॉ. डी. टी. शिर्के, विजयराव बोंद्रे आदी.

उपस्थिती दर्शवली. सन्मानपत्र, शाल, श्रीफल, पेहराव, पुष्पगुच्छ असे सत्काराचे स्वरूप होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. मोरे यांचे विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवर शैक्षणिक, प्रशासकीय कामकाजात खूप मोठे योगदान आहे. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वामुळे कोणताही पेचप्रसंग विचारपूर्वक व कायद्याच्या चौकटीत बसवून सोडवल्याची अनेक उदाहरणे आहेत. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणीही ते अतिशय कुशलपणे करतात. त्यांच्या आक्रमक स्वभावाला विवेकाची जोड आहे, त्यामुळे त्यांनी आयुष्यामध्ये प्रशासकीय निर्णय तर सोडवलेच पण खूप माणसदेखील जोडली. असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे म्हणाले, डॉ. मोरे यांनी शिवाजी विद्यापीठ प्रशासनासह परिक्षेत्रातील महाविद्यालय प्रशासनाला दिशा देण्याचे काम केले. सत्काराला उत्तर देताना डॉ. मोरे म्हणाले, महाराष्ट्रात शिवाजी विद्यापीठाला ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून हिनवले जायचे. सध्या मात्र मुंबई विद्यापीठाचा कारभार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सन्मानाने दिला आहे. हा शिवाजी विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा आहे.

ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, डॉ. राजेखान शानेदिवाण यांच्यासह अन्य प्राध्यापक, प्राचार्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभारी प्राचार्य प्रा. एकनाथ काटकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पंढरीनाथ पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे गौरव समितीचे कार्याध्यक्ष डॉ. पी. आर. शेवाळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सचिव रविंद्र भोसले यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. व्ही. एन. शिंदे, यांच्यासह विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठात राजकीय हस्तक्षेप नाही

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारताना मनात खूप भिती होती. पण कोल्हापूरकरांनी बांधलेला फेटा हा इतर कोणत्याही सन्मानापेक्षा श्रेष्ठ आहे, याचा पावलोपावली प्रत्यय आला. तसेच कोल्हापूर विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये राजकीय हस्तक्षेप होत नाही, हीच मोठी सन्मानाची गोष्ट आहे. त्यामुळेच शैक्षणिक पातळीवर अनेक धोरणात्मक निर्णय घेणे सहज सोपे जाते, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

10 OCT 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूर शिक्षण केंद्रामध्ये समन्वयकांची कार्यशाळा



कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्रामध्ये चालू शैक्षणिक वर्षामधील पदवी व पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेमध्ये एम.के.सी.एल. संगणक प्रणालीमध्ये असणाऱ्या समन्वयकांची कार्यशाळा नुकतीच झाली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी मार्गदर्शन केले. दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे अध्यक्षस्थानी होते.

बी.ए., बी.कॉम, एम.ए., एम.कॉम या वर्गाचे मॅन्युअल पद्धतीने प्रवेश व परीक्षा अर्ज घेतलेले आहेत. ऑक्टो/नोंव्हे २०१७ च्या परीक्षेंचे विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट, प्रश्न पत्रिकेचे वितरण व परीक्षा केंद्रावरील परीक्षेचे नियोजन करण्याच्या दृष्टीने कार्यशाळा झाली.

श्री. काकडे म्हणाले, 'शैक्षणिक वर्षामध्ये कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता आपण घेतली पाहिजे. विद्यार्थी हित समोर ठेवून प्रत्येकाला सेवा देण्यास आपण बांधिल असले पाहिजे. कर्मचारी आणि अधिकारी यांच्या प्रभावी नियोजनाने परीक्षा सुरळीत पार पाडत असतात. अभ्यास केंद्रातील समन्वयक व कर्मचाऱ्यांसाठी आगामी काळात व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट, प्रश्न पत्रिकेचे वितरण व परीक्षा केंद्रावरील परीक्षेचे नियोजन करण्याबाबत तांत्रिक अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन विभागाशी तत्काळ संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबतच्या समस्या सोडविणे गरजेचे आहे.''

उपकुलसचिव जी. आर. पळसे यांनी प्रश्नपत्रिका वितरणाबाबत माहिती दिली. दूर शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. पी. सोनजे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेसाठी उपकुलसचिव एन. एम. आकुलवार, दूर शिक्षण केंद्राच्या अभ्यास केंद्रातील ५८ समन्वयक, दूर शिक्षण केंद्राचे समन्वयक व कर्मचारी उपस्थित होते. समन्वयक प्रवीण लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

10 OCT 2017
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Install sanitary napkin vending machines in women's hostels: SUK

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges to install sanitary napkin vending machines in their ladies hostels and campus premises.

In a circular, dated October 7, it was said that the required machines should be bought from HLL Lifecare Limited—a 100% government public sector enterprise.

D T Shirke, pro-VC of the SUK, said, "We have already installed two vending machines on the SUK campus and few incinerators at the ladies hostel on main campus and one on Department of Technology campus. As per our preliminary reports they are being used and same has been asked to be replicated among other college campuses and hostels as well."

Rahul Gaikwad



The SUK said machines should be bought from HLL Lifecare Limited

When asked if any deadline has been given, he said they have not given any deadline but the colleges are supposed to install the machines at the earliest.

"We have had our interactions with colleges back in July and they should install it at the earliest. Soon, a report will be asked to be submitted on the implementation," he said.

Pratima Patil, rector at the ladies hostel, said they need to refill the stock frequently that shows the facility is being used by the girl students without any hesitation. She added that such facility should be present in other hostels across the region as well, given it is easy to use and dispose of.

Earlier in the month of July this year, a letter from the then secretary, UGC Jaspal Sandhu, stated that the problem of improper disposal of menstrual waste is a major roadblock to our achieving the Swachh Bharat Mission goal. Steps must be taken to solve the problems that improper disposal of sanitary napkins causes to the environment and to public health.

It added that the as a solution against these prevailing issues, HLL Lifecare Limited has introduced sanitary napkin vending machines and incinerators. These machines are highly inclined with the objectives of the Swachh Bharat Mission towards achieving a clean and healthy India by 2019.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2017
पुण्यनगरी

# चंद्रकांत लंगरे इंग्रजी अधिविभागप्रमुख

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील डॉ. चंद्रकांत



लंगरे यांची इंग्रजी अधिविभाग प्रमुखपदी निवड झाली आहे. डॉ. लंगरे हे कोल्हापूर जिल्ह्यातील धरणगुत्ती येथील आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटविला आहे.

डॉ. लंगरे यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इटली येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात आपले शोधनिबंध सादर केलेले आहेत. अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या सिएटल, वॉशिंग्टन आणि जॉन्स हॉफकिन्स युनिव्हर्सिटी, बाल्टीमोर मेरीलँड येथे सबालटर्न लिट्रेचर आणि श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांचा भारताच्या राष्ट्रीयत्व बांधणीमधील सहभाग या विषयावर आपले शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये तसेच विद्यापीठ अनुदान मंडळाद्वारे पुरस्कृत उजळणी वर्गामध्ये साधन व्यक्ती म्हणून काम केले आहे.

10 OCT 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : बीसीयूडीचे माजी संचालक व माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अनिता शिंदे. शेजारी डावीकडून अभयकुमार साळुंखे, मानसिंग बोंद्रे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विजय बोंद्रे, प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ काटकर, प्राचार्य डॉ. टी. आर. शेवाळे. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा).

# डॉ. डी. आर. मोरे यांचे तोडगा काढण्यातील कौशल्य भावते

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : निवृत्तीनिमित्त सत्कार

कोल्हापूर, ता. ९ : 'पेचप्रसंगात तोडगा काढण्यात डॉ. डी. आर. मोरे यांचे कौशल्य मनाला भावणारे आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

डॉ. डी. आर. मोरे गौरव समितीतर्फे 'बीसीयूडी'चे माजी संचालक व शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्या निवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते डॉ. मोरे यांना करवीर निवासिनी अंबाबाईची मूर्ती, शाल, श्रीफळ, तर अनिता शिंदे यांनी डॉ. मोरे यांच्या पत्नी गायत्री मोरे यांना साडी देऊन गौरविले. या वेळी प्रेरणा गौरव अंकाचे प्रकाशन झाले. यशवंतराव चव्हाण सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, "डॉ. मोरे यांचा स्वभाव जरी आक्रमक असला, तरी त्याला विवेक व अभ्यासाची जोड आहे. सर्वमान्यतेने तोडगा काढण्यात त्यांचे कौशल्य आहे.

डॉ. मोरे म्हणाले, "कधी कोणाला अडकविण्याचे काम न करता अडचणीतून मार्ग काढण्याचे काम केले. प्रत्येक कामाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची सवय लागली आहे. त्यामुळेच तीन प्राध्यापकांचा रखडलेला एक प्रश्न मार्गी लावता आला. कुलगुरूंनी दाखविलेला विश्वास सार्थ करण्याची संधी सोडली नाही. निवृत्त झालो असलो तरी यापुढे काम करीत राहीन." स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. मोरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळे पैलू अनुभवता आल्याचे सांगितले. माजी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी एक शिक्षक, मार्गदर्शक म्हणून डॉ. मोरे अनेकांच्या स्मरणात राहतील, असे स्पष्ट केले. या वेळी प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, प्रा. डी. एन. पंगु, प्रा. बी. बी. पाटील, प्रा. नीता धुमाळ, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. शर्मिला मोरे, प्रा. डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, सचिव विजय बोंद्रे, संग्राम मोरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. टी. आर. शेवाळे यांनी स्वागत केले. प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ काटकर यांनी प्रास्ताविक केले.